महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 व शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक सेनिवे 1092/27/ सेवा-4, दिनांक 19-7-1993 अन्वये मागील सेवा हिशेबात घेण्यासाठी पूर्वी घेतलेले निवृत्तिवेतन विषयक लाभ परत करताना आकारावयाचा व्याज दर -

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
निर्णय क्रमांक:-सेनिवे 1094/181/सेवा-4,
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 25 एप्रिल, 1995.

## शासन निर्णय

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 व शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-सेनिवे-1092/27/सेवा-4, दिनांक 19-7-1993 अन्वये मागील सेवा हिशेबात घेण्यासाठी पूर्वी घेतलेले निवृत्ति वेतन विषयक लाभ परत करताना त्यावर आकारावयाचा व्याज दर विहित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, जेथे कर्मचा-यांना राज्य शासन किंवा केंद्र शासन किंवा स्वायत्त संस्था यामध्ये केलेल्या पूर्वीच्या सेवेबद्दल घेतलेले निवृत्तिवेतन विषयक लाभ परत करणे आवश्यक आहे, तेथे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, 1982 मधील नियम 38 ते 41 व शासन निर्णय वित्त विभाग दिनांक 19-7-93 नुसार त्यांची पूर्वीची सेवा निवृत्तिवेतनासाठी हिशेबात घेतांना परत करण्यात येणा-या निवृत्तिवेतन विषयक लाभांच्या रकमेवर, सदरहू निवृत्तिवेतन विषयक लाभ घेतल्याच्या दिनांकापासून ते शासन/स्वायत्त संस्थेकडे परत करण्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीसाठी, व्याजाचा दर, सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीच्या ठेवीवर, वेळोवेळी लागू असलेल्या, व्याजाच्या दरानुसार राहील.

2. पूर्वीची सेवा निवृत्ति वेतनासाठी हिशेबात घेण्याकरिता कर्मचा-याने दिलेल्या विकल्पाच्या आधारे सक्षम प्राधिका-याने आदेश निर्गमित केल्यानंतर कर्मचा-याने निवृत्ती वेतन विषयक लाभ शासन /स्वायत्त संस्थेकडून पत्र मिळाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत परत केले नाहीत तर वर नमूद केलेल्या सर्वसाधारण व्याजदराच्या व्यतिरिक्त 1% दराने दंडात्मक व्याज आकारण्यात येईल.

3. हे आदेश निर्गमित होण्याच्या दिनांकापर्यंत निवृत्ति वेतन विषयक लाभ शासन/स्वायत्त संस्थाकडे परत करण्यात आलेले नाहीत अशा शासकीय/स्वायत्त संस्थांमधील कर्मचा-यांच्या प्रकरणी परिच्छेद-1 मध्ये नमूद केलेला व्याज दर लागू राहील.

4. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वसन्त चौधरी,
शासनाचे अवर सचिव.

प्रति,
महालेखापाल कार्यालय
भारत सरकार [illegible] कार्मिक व लोक गा-हाणी व निवृत्ती वेतन, मंत्रालय, नवी दिल्ली,

28 JUL 1995

शामुमुं/रोटो/एक-[illegible] (20-1-95)

Rate of interest chargeable on refund of pensionary benefits already drawn, in connection with counting of past service under Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 and Government Resolution, Finance Department No.PEN-1092/27/SER-4, dated 19-7-1993

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
Finance Department,
Resolution No.PEN-1094/181/SER-4,
Mantralaya, Bombay-400 032, Dated the 25th April 1995.

**RESOLUTION**

The Government have had under consideration the question of prescribing the rate of interest chargeable on refund of pensionary benefits already drawn, in connection with counting of past services under Maharashtra Civil Services (Pension) Rules 1982 and Government Resolution, Finance Department, No.PEN-1092/27/SER-4, dated 19-7-1993. Government is now pleased to decide that wherever the employees are required to refund the pensionary benefits received by them for the service already rendered by them under the State of Central Government or Autonomous Bodies in order to avail of the benefit of counting of past services for pension purposes in terms of the provisions of Rules 38 to 41 of Maharashtra Civil Services (Pension) Rules, 1982 and Government Resolution, Finance Department, No.PEN-1092/27/SER-4, dated 19-7-1993, the rate of interest chargeable on the refund of Pensionary benefits will be the rate applicable on General Provident Fund accumulation from time to time for the period from the date of receipt of pensionary benefits to date of their refund to the Government/Autonomous Body.

2. In cases where, after the issue of the orders by the competent authority on the basis of option exercised by an employee for counting of past service for pensionary purposes, an individual does not deposit the pensionary benefits already received by him within one month of the receipt of communication from the Government/ Autonomous Body, a penal interest @ 1 per cent per annum will be charged in addition to the normal rate of interest mentioned above.

3. The rate of interest mentioned in para 1 above will be applicable in cases of Government servants/employees of Autonomous Bodies where pensionary benefits already drawn have not been refunded to Government/Autonomous Body as on the date of issue of this Resolution.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V.W.Chaudhari,
Under Secretary to Government.

--------

H-131(13000+20-4-95)-3